शिक्षण मंडळ कराड, संचालित

# महिला महाविद्यालय कराड

## अर्थशास्त्र विभाग

## बहुपर्यायी प्रश्न

विषय - आर्थिक विचारांचा इतिहास पेपर I

बी.ए भाग - III सेम - V

प्र.क्र 1) कोणती विचारसरणी ही ही मध्ययुगीन विचारा विरुद्ध एक प्रतिक्रिया होती ?
अ) निसर्गवादी ब) धार्मिक क) व्यापारवादी ड) सनातनवादी

प्र. क्र. 2) कोणत्या पंथाने ऐहिक सुखात पैशाला व भौतिक वस्तूला महत्त्व दिले आहे.
अ) कॅथलिक ब) प्रोटेस्टंट क) सनातन ड) नवसनातन

प्र. क्र. 3) व्यापारवादी विचारसरणी मध्ये कोणत्या क्षेत्राला अधिक महत्त्व देण्यात आले आहे ?
अ) शेती ब) उद्योग क) विदेशी व्यापार ड) यंत्र उत्पादन

प्र. क्र. 4) ………..विचारसरणीनुसार देशाला आर्थिक महासत्ता बनविण्यासाठी मौल्यवान धातूचा संचय करणे आवश्यक आहे
अ) व्यापरवादी ब) निसर्गवादी क) सनातनवादी ड) नवसनातनवादी

प्र. क्र. 5) निसर्गवादी विचारसरणीचा उदय कोणत्या देशात झाला ?
अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) जर्मनी ड) जपान

प्र. क्र. 6) निसर्गवाद्यांच्या मते आधिक्य किंवा वाढावा हा फक्त………. या क्षेत्रामध्येच निर्माण होतो.
अ) व्यापार ब) शेती क) उद्योग ड) कारखानदारी

प्र. क्र. 7) निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक व्यवस्थेचे शास्त्र आहे अशी व्याख्या कोणी केली
अ) प्रा हॅने ब) ड्युपांट डी नेमर्स क) मिरॅब्यु ड) डॉ क्वेस्ने

प्र. क्र. 8) निसर्ग व्यवस्थेत निसर्गनियम कोणी निर्माण केलेले असतात ?
अ) मानवाने ब) ईश्वराने क) शासनाने ड) जनतेने

प्र. क्र. 9) निसर्गवाद्यांच्या मते फक्त…………..हाच व्यवसाय उत्पादक व्यवसाय आहे.
अ) व्यापार ब) शेती क) यंत्रउद्योग ड) वरीलपैकी सर्व

प्र. क्र. 10) संपत्तीच्या संचलनाचा आराखडा कोणी मांडला ?
अ) प्रा हॅने ब) ड्युपांट डी नेमर्स क) मिरॅब्यु ड) डॉ क्वेस्ने

प्र. क्र. 11) डॉ. क्वेस्ने यांच्या मते संपत्तीचे केंद्रीकरण शेवटी……………..या वर्गाकडे होते.
अ) व्यापारी ब) जमीनदार क) शेतकरी ड) कारागिर

प्र. क्र. 12) निसर्गवादी विचारवंतांनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये मध्ये कोणत्या घटकाला अधिक महत्त्व दिले आहे ?

अ) शेती व निसर्गव्यवस्था ब) व्यापार व उद्योग क)  मौल्यवान धातूचा संचय ड) संपत्तीचा साठा

प्र. क्र. 13) श्रमविभागणीची संकल्पना कोणी मांडली आहे ?
अ) डेव्हिड रिकार्डो ब) ॲडम स्मिथ क) थॉमस माल्थस ड) वरीलपैकी सर्व

प्र. क्र. 14) ॲडम स्मिथ यांच्यामते वस्तूचे मूल्य………यावरून ठरते.
अ) उत्पादनखर्चावरून ब) श्रमावरून क) उपयोगीतेवरून ड) वरीलपैकी सर्व

प्र. क्र. 15) ॲडम स्मिथ यांच्यामते …………. मूल्य हे नेहमी बदलणारे असते.
अ) उपयोगिता मुल्य  ब) विनिमय मुल्य क) बाजार मुल्य  ड) नैसर्गिक मूल्य

प्र. क्र. 16) डेव्हिड रिकार्डो यांच्या मते खंड हा फक्त…….याच उत्पादन घटकाला मिळतो
अ) भांडवल      ब) भूमी        क) श्रम     ड) संयोजक

प्र. क्र. 17) डेव्हिड रिकार्डो यांच्या मते वस्तूचे मूल्य………खर्चावरून निश्चित होते.
अ) उत्पादन    ब) श्रम     क) सीमांत      ड) सरासरी

प्र. क्र. 18) लोकसंख्या वाढीचा सिद्धांत कोणी मांडला आहे ?
अ) डेव्हिड रिकार्डो ब) ॲडम स्मिथ क) थॉमस माल्थस ड) प्रा. मार्शल

प्र. क्र. 19) थॉमस माल्थस यांच्यामते अन्नधान्यातील वाढीपेक्षा लोकसंख्येतील वाढ…………..असते.
अ) जास्त      ब) कमी        क) मध्यम     ड) अति कमी

प्र. क्र. 20) सनातनवादी संप्रदायावर सर्वप्रथम टीका कोणत्या  विचारवंतांने केली आहे.
अ) कार्ल मार्क्स ब) डेव्हिड रिकार्डो क) फ्रेड्रिक लिस्ट  ड) थॉमस माल्थस

प्र. क्र. 21) फ्रेडरिक लिस्ट याने आर्थिक विकासाचे किती टप्पे सांगितले आहेत ?
अ) चार        ब) तीन       क) पाच     ड) सहा

प्र. क्र. 22) ……….. यांच्यामते जगातील सर्व देश विकासाच्या समान पातळीवर असतात.
अ) कार्ल मार्क्स ब) डेव्हिड रिकार्डो क) फ्रेड्रिक लिस्ट  ड) थॉमस माल्थस

प्र. क्र. 23) फ्रेडरिक लिस्ट यांनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये………….या घटकाला अधिक महत्त्व दिले आहे
अ) व्यक्ती   ब) राष्ट्र     क) समाज      ड) विश्व

प्र. क्र. 24) राष्ट्राच्या विकासाशिवाय व्यक्ती, समाज व विश्व यांचा विकास करणे अशक्य आहे अशा प्रकारचे मत कोणत्या विचारवंताने मांडले आहे ?
अ) कार्ल मार्क्स ब) डेव्हिड रिकार्डो क) फ्रेड्रिक लिस्ट  ड) थॉमस माल्थस

प्र. क्र. 25) फ्रेडरिक लिस्ट  यांच्यामते  देशात संपत्ती निर्माण करण्यासाठी…………..उत्पादनशक्ती वाढवणे आवश्यक आहे.
अ) देशाची ब) व्यक्तीची  क)  समाजाची  ड) सरकारची

प्र. क्र. 26) दास कॅपिटल हा सुप्रसिद्ध ग्रंथ कोणत्या आर्थिक विचारवंताने लिहिला आहे ?

अ) कार्ल मार्क्स ब) डेव्हिड रिकार्डो क) फ्रेड्रिक लिस्ट  ड) थॉमस माल्थस

प्र. क्र. 27) शास्त्रीय समाजवादाची संकल्पना कोणत्या आर्थिक विचारवंताने मांडली आहे ?
अ) कार्ल मार्क्स ब) डेव्हिड रिकार्डो क) फ्रेड्रिक लिस्ट  ड) थॉमस माल्थस

प्र. क्र. 28) अतिरिक्त मूल्याची निर्मिती ही..........वर्गाच्या शोषणातून होते असे कार्ल मार्क्सचे मत आहे.
अ) कामगार ब) जमीनदार  क) भांडवलदार  ड) माहीत नाही

प्र. क्र. 29) ............वर्ग कामगारांचे शोषण करून नफा मिळवितो  असे कार्ल मार्क्सचे मत आहे.
अ) भांडवलदार  ब) जमीनदार  क) व्यवसायिक  ड) वरील सर्व

प्र. क्र. 30) विरोध विकासाचे तत्व कोणी मांडले आहे ?
अ) हेगेल  ब) फ्रेडरिक लिस्ट क) कार्ल मार्क्स  ड) माल्थस

प्र. क्र. 31) अतिरिक्त मूल्याची संकल्पना........ या विचारवंतांने मांडली आहे.
अ) फ्रेडरिक लिस्ट ब) अँडम स्मिथ  क) कार्ल मार्क्स ड) माल्थस

प्र. क्र. 32) अतिरिक्त मूल्याची निर्मिती............... या विनिमय व्यवहारात होते.
अ) वस्तू-वस्तू ब) पैसा-वस्तू-पैसा  क) वस्तू-पैसा-वस्तू ड) वरीलपैकी नाही

प्र. क्र. 33) राष्ट्रवादाची संकल्पना ........ या विचारवंतांने मांडली आहे.
अ) फ्रेडरिक लिस्ट ब) अँडम स्मिथ  क) कार्ल मार्क्स ड) माल्थस

प्र. क्र. 34) फ्रेडरिक लिस्टच्या मते मुक्त व्यापाराचे धोरण.......देशांना फायदेशीर ठरते.
अ) प्रगत ब) मागास   क) अविकसित   ड)  वरील सर्व

प्र. क्र. 35) फ्रेडरिक लिस्टच्या मते आर्थिक सिध्दांत व नियम परिस्थिती.............असावेत.
अ) सापेक्ष     ब) निरपेक्ष     क) पारदर्शक   ड)  वरीलपैकी नाही

उत्तरे
1)क 2)ब 3)क 4)अ 5)ब 6)ब 7)ब 8)ब 9)ब 10)ड 11)क 12)अ 13)ब 14)ब 15)क 16)ब 17)ब 18)क 19)अ 20)क 21)क 22)क 23)ब 24)क 25)अ 26)अ 27)अ 28)अ 29)अ 30)क 31)क 32)ब 33)अ 34)अ 35)अ

प्रा. अनिल सुतार
अर्थशास्त्र विभाग
(महिला महाविद्यालय कराड)

## UNIT NO I
## आर्थिक विचारांचा उगम

२. व्यापारवादी विचारसरणीत खालीलपैकी .... या विचारवंताचा समावेश होतो.

(अ) जीन बोडिन (ब) थॉमस मीन

(क) लॉक (ड) वरील सर्व

३. व्यापारवादाच्या उदयाची चर्चा खालीलपैकी .... या मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

(अ) तत्कालीन आर्थिक परिस्थिती (ब) राजकीय बदल

(क) धर्माचा प्रभाव (ड) वरील सर्व

४. व्यापारवादी विचारसरणीमध्ये खालीलपैकी .... या घटकाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते.

(अ) पैसा (ब) व्यापार

(क) व्यापारातील अनुकूलता (ड) वरील सर्व

५. व्यापारवादी विचारसरणीचे प्रमुख उद्दिष्ट .... हे होते.

(अ) अधिक सुवर्ण (ब) अधिक संपत्ती

(क) अधिक सुवर्ण – अधिक संपत्ती – अधिक सत्ता

(ड) वरीलपैकी नाही.

६. व्यापारवादी विचारसरणीमध्ये .... वर भर दिलेला दिसून येतो.

(अ) प्रतिकूल व्यापारतोल (ब) अनुकूल व्यापारतोल

(क) वरील दोन्ही (ड) यापैकी नाही.

७. .... हा कर आकारणीच्या प्रश्नावर शास्त्रीय पद्धतीने विचार करणारा पहिला ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ होय.

(अ) लॉक (ब) जॉन मीड

(क) विल्यम पेट्टी (ड) सॅम्युअल फोर्टे

८. 'देशाची लोकसंख्या आणि देशाची सुबत्ता परस्परांना पूरक असतात. त्यापैकी एकीच्या वाढीमुळे दुसरीचे पोषण होते' असे व्यापारवादी विचारसरणीतील .... या तज्ज्ञाने म्हटले.

९. १८ व्या शतकात फ्रान्समध्ये जो आर्थिक विचार मांडला गेला त्यास ... असे म्हटले जाते.

(अ) व्यापारवादी विचारधारा (ब) निसर्गवादी विचारधारा

(क) भौतिक विचारधारा (ड) वरीलपैकी नाही.

१०. निसर्गवादी विचारधारेस 'कृषिवादी संप्रदाय' असे नाव .... दिले.

(अ) ॲडम स्मिथ (ब) डेव्हिड रिकार्डो

(क) थॉमस माल्थस (ड) फ्रेडरिक लिस्ट

११. निसर्गवादी विचारसरणीत खालीलपैकी .... या विचारवंतांचा समावेश होतो.

(अ) मिरॅब्यू (ब) ड्युपांट डी. नेमर्स

(क) टर्गो (ड) वरील सर्व

१२. निसर्गवादी विचारसरणीच्या उदयाचे कारण ....

(अ) फ्रान्समधील तत्कालीन परिस्थिती

(ब) व्यापारवादी विचारसरणीतील मर्यादा

(क) शेतकरी वर्गाची दुरवस्था

(ड) वरील सर्व

१३. निसर्गवादी विचारसरणीनुसार .... हा एकमेव उत्पादक व्यवसाय आहे.

(अ) व्यापार (ब) उद्योग

(क) शेती (ड) वरील सर्व

१४. निसर्गवादी विचारसरणीच्या मते आधिक्य हे केवळ .... मध्ये निर्माण होते.

(अ) शेती (ब) व्यापार

(क) उद्योग (ड) वरील सर्व

१५. निसर्गवादी विचारसरणीच्या मते संपूर्ण राष्ट्राची सुबत्ता .... वर अवलंबून असते.

(अ) शेती (ब) व्यापार

(क) उद्योग (ड) वरील सर्व

# UNIT NO II
# सनातनवादी आर्थिक विचार

१. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ असा शब्दप्रयोग सर्वप्रथम .... यांनी केला.

(अ) अ‍ॅडम स्मिथ (ब) डेव्हिड रिकार्डो

(क) थॉमस माल्थस (ड) कार्ल मार्क्स

२. सनातनवादी संप्रदायामध्ये ..... या अर्थशास्त्रज्ञाचा समावेश होतो.

(अ) अ‍ॅडम स्मिथ (ब) डेव्हिड रिकार्डो

(क) थॉमस माल्थस (ड) वरील सर्व

३. अ‍ॅडम स्मिथ यांनी .... हा युगप्रवर्तक ग्रंथ लिहिला.

(अ) अर्थशास्त्र (ब) राष्ट्रांची संपत्ती

(क) राजकीय अर्थशास्त्र (ड) अर्थशास्त्राची मूलतत्त्वे

४. अ‍ॅडम स्मिथ यांनी .... ची संकल्पना सर्वप्रथम मांडली.

(अ) श्रमविभागणी (ब) संपत्ती

(क) व्याज (ड) खंड

५. अ‍ॅडम स्मिथ यांनी .... चा पाया घातला.

(अ) मूल्य सिद्धांत (ब) खंड सिद्धांत

(क) वेतन सिद्धांत (ड) व्याज सिद्धांत

६. .... यांला अर्थशास्त्राचा जनक म्हणतात.

(अ) अ‍ॅडम स्मिथ (ब) डेव्हिड रिकार्डो

(क) थॉमस माल्थस (ड) कार्ल मार्क्स

७. रिकार्डो यांनी प्रथम .... सिद्धांत मांडला.

(अ) खंड (ब) व्याज

(क) नफा (ड) वेतन

८. रिकार्डोच्या मते .... वरून खंड ठरतो.

(अ) किमती (ब) पुरवठा

(क) मागणी (ड) वस्तूची लवचीकता

९. माल्थस यांचा लोकसंख्या सिद्धांत .... मध्ये प्रकाशित झाला.

(अ) १७९८ (ब) १७९१

(क) १८०२ (ड) १८०५

१०. माल्थस यांनी .... या विषयावर महत्त्वपूर्ण लिखाण केले.

(अ) खंड (ब) भांडवल संचय

(क) तंत्रविकास (ड) लोकसंख्या घट

११. माल्थस यांच्या मते .... मुळे मंदी निर्माण होते.

(अ) अतिरिक्त उत्पादन (ब) न्यून धान्य उत्पादन

(क) संपत्तीचे केंद्रीकरण (ड) श्रीमंतांचा उपभोग

१२. ॲडम स्मिथच्या आर्थिक विचारांच्या इतिहासातील योगदान .... या विचाराने अधिक चांगले स्पष्ट करता येईल.

(अ) स्मिथचा निसर्गवाद व आशावाद

(ब) श्रमविभागणीचे तत्त्व

(क) मूल्य सिद्धांत व कर कसोट्या (ड) वरील सर्व

१३. ॲडम स्मिथच्या मते अर्थव्यवस्थेच्या .... अवस्थेत मूल्याचा उत्पादन खर्च सिद्धांत खरा ठरतो.

(अ) मागास (ब) प्राथमिक (क) प्रगत (ड) अप्रगत

१४. 'The Principles of Political Economy' या १८१७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाचा लेखक .... होय.

(अ) ॲडम स्मिथ (ब) डेव्हिड रिकार्डो

(क) थॉमस माल्थस (ड) कार्ल मार्क्स

१५. 'वस्तूचे मूल्य हे ती वस्तू उत्पादित करण्यासाठी जेवढे श्रम खर्ची पडतील त्यावरून ठरते' असे .... म्हटले.

(अ) जे. बी. से (ब) थॉमस माल्थस

(क) डेव्हिड रिकार्डो (ड) वरील सर्व

१७. 'खंडावरून किंमत ठरत नसून किमतीवरून खंड ठरतो' असे विधान .... यांनी केले.

(अ) ॲडम स्मिथ
(ब) डेव्हिड रिकार्डो
(क) थॉमस माल्थस
(ड) वरील सर्व

१८. लोकसंख्या सिद्धांत .... संबंधित आहे.

(अ) ॲडम स्मिथशी
(ब) डेव्हिड रिकार्डोशी
(क) थॉमस माल्थसशी
(ड) कार्ल मार्क्सशी

१९. थॉमस माल्थसच्या मते देशाची लोकसंख्या .... ने वाढते.

(अ) भूमितीय श्रेणी
(ब) गणितीय श्रेणी
(क) वरील दोन्ही
(ड) वरीलपैकी नाही.

२०. थॉमस माल्थसच्या मते देशातील अन्नधान्याचा पुरवठा .... ने वाढतो.

(अ) भूमितीय श्रेणी
(ब) गणितीय श्रेणी
(क) वरील दोन्ही
(ड) वरीलपैकी नाही.

२१. अतिरिक्त उत्पादनाचा सिद्धांत .... यांनी मांडला.

(अ) ॲडम स्मिथ
(ब) डेव्हिड रिकार्डो
(क) थॉमस माल्थस
(ड) कार्ल मार्क्स

२२. अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती .... यामुळे निर्माण होते.

(अ) भांडवल संचय
(ब) न्यून उपभोग
(क) वरील दोन्ही
(ड) आर्थिक मंदी

## UNIT NO III
## फ्रेडरिक लिस्टचे आर्थिक विचार

१. सनातन संप्रदायाच्या खुल्या व्यापारी धोरणावर जोरदार टीका करून संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करणारा अर्थशास्त्रज्ञ .... हा होय.

(अ) ॲडम स्मिथ (ब) डेव्हिड रिकार्डो

(क) थॉमस माल्थस (ड) फ्रेडरीक लिस्ट

२. लिस्टच्या मते .... हा सरकारच्या धोरणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे.

(अ) राष्ट्र (ब) व्यक्ती

(क) समाज (ड) वरीलपैकी नाही

३. लिस्टच्या मते मागास आणि अविकसित देशांना .... धोरणातून कोणताही फायदा मिळण्याची शक्यता असते.

(अ) खुला व्यापार (ब) संरक्षित व्यापार

(क) दोन्ही (अ) आणि (ब) (ड) वरीलपैकी नाही

४. लिस्टच्या मते प्रत्येक राष्ट्राने आपल्या देशाच्या .... विचार करून स्वतंत्र आर्थिक धोरण स्वीकारावे.

(अ) आर्थिक परिस्थितीचा (ब) आर्थिक प्रश्नांचा

(क) औद्योगिक परिस्थितीचा (ड) वरील सर्व

५. लिस्टच्या आर्थिक विचारांनुसार राष्ट्राची उत्पादनशक्ती .... वर अवलंबून असते.

(अ) सांस्कृतिक व प्रशासकीय संस्थांवर

(ब) राष्ट्राच्या भौतिक मूल्यांवर

(क) राष्ट्राच्या आर्थिक धोरणावर

(ड) वरील सर्व

६. लिस्टच्या मते मुक्त व्यापारी धोरण हे नेहमी .... देशांना फायदेशीर ठरते.

(अ) प्रगत (ब) मागास

(क) उष्ण कटिबंधातील (ड) वरील सर्व

७. लिस्टच्या मते मुक्त व्यापारी धोरण हे नेहमी .... देशांना नुकसानीचे ठरते.

(अ) प्रगत (ब) विकसित

(क) मागास (ड) वरील सर्व

८. लिस्टच्या मतानुसार आर्थिक सिद्धांत व नियम .... असावेत.

(अ) परिस्थितिनिरपेक्ष (ब) परिस्थितिसापेक्ष

(क) पारदर्शक (ड) वरीलपैकी नाही.

९. लिस्टच्या मते देशाचे आर्थिक धोरण निश्चितीवेळी .... प्राधान्य द्यावयास हवेत.

(अ) व्यक्तिहितास (ब) राष्ट्रहितास

(क) समाजहितास (ड) वरील सर्व

१०. जगातील सर्व देश हे एकाच समान आर्थिक पातळीवर असतात असे .... ने प्रतिपादन केले.

(अ) सनातन संप्रदाय (ब) लिस्ट

(क) व्यापारी विचारसरणी (ड) निसर्गवादी

११. जगातील बहुतांश देश हे आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर किंवा पातळीवर असतात, असे .... ने प्रतिपादन केले.

(अ) सनातन संप्रदाय (ब) लिस्ट

(क) व्यापारी विचारसरणी (ड) निसर्गवादी

१२. लिस्टच्या आर्थिक विकासाच्या टप्प्यांतील पहिली अवस्था .... ही होय.

१३. लिस्टच्या मते आर्थिक विकासाच्या पहिल्या अवस्थेत .... अवलंबणे उचित ठरते.

(अ) मुक्त व्यापारी धोरण (ब) संरक्षित व्यापारी धोरण

(क) मिश्र व्यापारी धोरण (ड) कडक निर्बंधाचे धोरण

१४. लिस्टच्या विचारांनुसार उष्ण कटिबंधातील देशांनी .... अवलंबणे उचित ठरते.

(अ) मुक्त व्यापारी धोरण (ब) संरक्षित व्यापारी धोरण

(क) मिश्र व्यापारी धोरण (ड) कडक निर्बंधाचे धोरण

१५. लिस्टच्या मते आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेत विश्ववादी भूमिका स्वीकारल्यास राष्ट्राच्या आर्थिक विकासाला .....

(अ) अडथळा निर्माण होतो. (ब) मदत होते.

(क) चालना मिळते. (ड) वरीलपैकी नाही.

१६. लिस्टच्या मते एखाद्या राष्ट्राने खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारायचे की संरक्षणाचे धोरण स्वीकारायचे हे त्या राष्ट्राच्या .... अवलंबून असते.

(अ) राजकीय स्थितीवर (ब) धार्मिक स्थितीवर

(क) आर्थिक विकासावर (ड) वरील सर्ववर

## UNIT NO IV
## कार्ल मार्क्सचे आर्थिक विचार

१. साम्यवादी विश्वक्रांतीचा कृतिशील पुरस्कर्ता म्हणून .... हे नाव घेतले जाते.

(अ) ॲडम स्मिथ (ब) थॉमस माल्थस

(क) कार्ल मार्क्स (ड) लॉक

२. 'दास कॅपिटल' हा ग्रंथ .... याने लिहिला.

(अ) ॲडम स्मिथ (ब) थॉमस माल्थस

(क) कार्ल मार्क्स (ड) लॉक

३. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा विचार .... दृष्टिकोणातून केला जातो.

(अ) विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद

(ब) इतिहासाची भौतिकवादी मीमांसा

(क) दोन्ही (अ) आणि (ब)

(ड) वरीलपैकी एकही नाही

४. .... अर्थव्यवस्था संघर्षामुळे नष्ट होईल, असे कार्ल मार्क्स म्हणतो.

(अ) भांडवलशाही (ब) समाजवादी

(क) साम्यवादी (ड) मिश्र

५. 'मानव समाजाचा आजतागायतचा इतिहास हा वर्गलढ्याचा इतिहास आहे' असे .... ने म्हटले.

(अ) ॲडम स्मिथ (ब) कार्ल मार्क्स

(क) डेव्हिड रिकार्डो (ड) फ्रेडरीक लिस्ट

६. मार्क्सच्या मूल्य सिद्धांताला .... सिद्धांत असेही म्हणतात.

(अ) श्रममूल्य (ब) उपयोगिता मूल्य

(क) विनिमय मूल्य (ड) वरीलपैकी नाही

७. मार्क्सच्या मते प्रत्येक उत्पादित वस्तूला .... प्रकारचे मूल्य असते.

(अ) उपयोगिता मूल्य (ब) विनिमय मूल्य

(क) उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य (ड) वरीलपैकी नाही

८. अतिरिक्त मूल्याची संकल्पना .... याने केली.

(अ) ॲडम स्मिथ (ब) कार्ल मार्क्स

(क) थॉमस माल्थस (ड) रिकार्डो

९. .... म्हणजे कामगाराच्या कामातून निर्माण होणारे मूल्य व कामासाठी मोबदला म्हणून कामगाराला देण्यात येणारे मूल्य यामधील तफावत होय.

(अ) अतिरिक्त मूल्य (ब) श्रममूल्य

(क) उपयोगिता मूल्य (ड) विनिमय मूल्य

१०. मार्क्सच्या मते श्रमिकाचे शोषण हे .... समाजरचनेच्या विशिष्ट उत्पादन संबंधातून झालेले असते.

(अ) समाजवादी (ब) भांडवलशाही

(क) साम्यवादी (ड) वरील सर्व

११. कम्युनिस्ट मॅनिफॅस्टो ही पुस्तिका .... यांनी लिहिली.

(अ) माल्थस (ब) स्मिथ

(क) रिकार्डो (ड) मार्क्स

१२. श्रमाची भांडवलशाहीत होणारी पिळवणूक ही केवळ .... होत नसते असे मार्क्सला वाटते.

(अ) अतिरिक्त मूल्यातून (ब) श्रम मूल्यातून

(क) विनिमय मूल्यातून (ड) उपयोगिता मूल्यातून

१३. मार्क्सच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेत पैशाचा उपयोग .... साठी केला जातो.

१४. मार्क्सने प्रतिपादन केलेले राखीव कामगार दल म्हणजे .... होय.

*(अ) बेकार कामगारांची संख्या* *(ब) उद्योगातील कामगारांची संख्या*

*(क) शेतीतील कामगारांची संख्या* *(ड) वरील सर्व*

१५. मार्क्सच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेत समतोल होत नसल्याने .... निर्माण होऊन भांडवलशाहीचा नाश होतो.

*(अ) तेजीचे चक्र* *(ब) मंदीचे चक्र*

*(क) तेजी-मंदी चक्रे* *(ड) वरीलपैकी नाही.*

१६. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना त्या अर्थव्यवस्थेत .... वैशिष्ट्ये दिसून येतात.

*(अ) भांडवलवाढ आणि अत्युत्पादन* *(ब) उपभोगन्यूनता आणि बेकारी*

*(क) आर्थिक मंदी* *(ड) वरील सर्व*